21 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. शिर्के उत्तम संख्याशास्त्रज्ञ, विद्यार्थीप्रिय शिक्षक

## देश-विदेशांतील संख्याशास्त्रज्ञांकडून कुलगुरूंच्या शैक्षणिक कारकिर्दीचा गौरव

कोल्हापूर, ता. २० : 'उत्तम संख्याशास्त्रज्ञ, तंत्रज्ञानाभिमुख, विद्यार्थीप्रिय शिक्षक, कुलगुरू पदापर्यंत झेप घेऊनही जमिनीशी घट्ट राहणारा प्रशासक, प्रसन्नचित्त व्यक्तिमत्त्वाचे धनी असलेला माणूस, अशा अनेक विशेषणांसह स्तुतिसुमनांचा वर्षाव करीत देश-विदेशातील संख्याशास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कारकिर्दीचा गौरव केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत त्यांचा सत्कार प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डावीकडून दत्तात्रय काशीद, शशीभूषण महाडिक, सुनीता शिर्के, हेमांगी कुलकर्णी उपस्थित होत्या.

कुलगुरू डॉ. शिर्के ३० जून रोजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक म्हणून नियत वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. त्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेमधील अखेरचे सत्र हे डॉ. शिर्के यांच्या सन्मानार्थ घेतले. अध्यक्षस्थानी डॉ. शिर्के यांचे गुरू प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी होते.

अमेरिकेतील मिसिसिपी स्टेट विद्यापीठाचे प्रा. प्रकाश पाटील म्हणाले, 'कुलगुरू असूनही कधी पदाचा बडेजाव न मिरविणारे, अत्यंत साधेपणाने आणि विनम्रभावाने सर्वांना भेटणारे असे हे भारतातले एक दुर्मीळ कुलगुरू आहेत.'

ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे म्हणाले, 'डॉ. शिर्के यांची त्यांच्या कामाप्रती असलेली निष्ठा मला भावते. ते अत्यंत कर्तव्यतत्पर शिक्षक, संशोधक आणि प्रशासक आहेत.' प्रा. रट्टीहळ्ळी म्हणाले, 'डॉ. शिर्के यांच्यासारखा विद्यार्थी मिळाला, याचा आम्हाला सदैव अभिमान वाटला.'

कार्यक्रमात डॉ. रट्टीहळ्ळी यांच्या हस्ते डॉ. शिर्के यांचा कोल्हापुरी फेटा, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ. शिर्के आणि तुकाराम शिर्के, अरविंद आणि मधुकर शिर्के यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. शिवाजी पाटील, शिवाजी डिसले, डी. जी. गोडसे, दिनेश हेलवाडे, मधुसूदन अडकी, शशिभूषण महाडिक, सुकुमार राजगुरू, सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

### 'आय विल कन्टिन्यू टू स्माईल!'

'आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मला चांगले मार्गदर्शक शिक्षक मिळाले, म्हणून आजवरचा पल्ला गाठण्यात यश आले. ४० वर्षांपूर्वी मी विद्यापीठात विद्यार्थी म्हणून दाखल झालो, तेथपासून हा कुलगुरू पदापर्यंतचा प्रवास याच कर्मभूमीत घडला. मान, सन्मान, पद, प्रतिष्ठा असे सर्व काही देणाऱ्या या मातृसंस्थेच्या ऋणातून उतराई होणे अशक्य आहे. हल्ली 'पुढे काय?' असा एक प्रश्न मला सातत्याने विचारला जातो. मात्र, सध्या तरी माझ्यासमोर एक मोठा कोरा कॅनव्हास आहे. शेजारी विविधरंगांनी भरलेले पॅलेटही आहे. जेव्हा कधी त्या कॅनव्हासवर चित्र उतरेल, तेव्हा मी ते आवर्जून सर्वांना दाखवेन', असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. अनेकांनी डॉ. शिर्के यांच्या हसतमुख व्यक्तिमत्त्वाचा उल्लेख केला. तो धागा पकडून ते उद्गारले, 'आय विल कन्टिन्यू टू स्माईल!'

21 JUN 2025 लोकमत
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डी. टी. शिर्के म्हणजे उपाय सुचविणारा उत्तम संख्याशास्त्रज्ञ

## शास्त्रज्ञांकडून गौरव : निवृत्तीनिमित्त भावना व्यक्त

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या निवृत्तीनिमित्त आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेत त्यांचा प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कोल्हापूर : कोणत्याही समस्येवर तत्परतेने उपाय सुचविणारा उत्तम संख्याशास्त्रज्ञ, तंत्रज्ञानाभिमुख, विद्यार्थिप्रिय, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यास प्राधान्य देणारा शिक्षक अशा अनेक विशेषणांसह स्तुतीसुमनांचा वर्षाव करीत देशविदेशांतील संख्याशास्त्रज्ञांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. डी. टी. शिर्के यांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कारकिर्दीचा गुरुवारी गौरव केला.

कुलगुरू डॉ. शिर्के हे येत्या ३० जून रोजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक म्हणून नियत वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. त्यानिमित्ताने विद्यापीठात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेमधील अखेरचे सत्र हे डॉ. शिर्के यांच्या सन्मानार्थ आयोजित केले. गौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ प्रा. आर. एन. रट्टीहळ्ळी होते. डॉ. सुनीता शिर्के आणि संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक मंचावर उपस्थित होते. अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट विद्यापीठाचे प्रा. प्रकाश पाटील म्हणाले, डॉ. शिर्के कुलगुरू असूनही कधी पदाचा बडेजाव न मिरविणारे, अत्यंत साधेपणाने आणि विनम्रभावाने सर्वांना भेटणारे असे कुलगुरू आहेत. यावेळी डॉ. अनिल गोरे, प्रा. रट्टीहळ्ळी यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास डॉ. शिर्के यांचे वडील तुकाराम शिर्के, बंधू अरविंद व मधुकर उपस्थित होते.

### सध्या तरी एक मोठा कोरा कॅनव्हास

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मला चांगले मार्गदर्शक शिक्षक मिळाले, म्हणून आजवरचा पल्ला गाठण्यात यश आले. हल्ली 'पुढे काय?' असा एक प्रश्न मला सातत्याने विचारला जातो. मात्र, सध्या तरी माझ्यासमोर एक मोठा कोरा कॅनव्हास आहे. शेजारी विविधरंगांनी भरलेले पॅलेटही आहे. जेव्हा कधी त्या कॅनव्हासवर चित्र उतरेल, तेव्हा मी ते आवर्जून साऱ्यांना दाखवेन.

महाराष्ट्र न्यूज वन

# कुलगुरुनंतर पुढे काय ? या प्रश्नावर डी. टी. शिर्के म्हणाले माझ्यासमोर एक मोठा....

20 Jun 25 by 779 शैक्षणिक



महाराष्ट्र न्यूज वन प्रतिनिधी, कोल्हापूर : 'हल्ली 'पुढे काय?' असा एक प्रश्न मला सातत्याने विचारला जातो आणि त्याविषयी अनेक तर्कवितर्कही लढविले जातात. मात्र, सध्या तरी माझ्यासमोर एक मोठा कोरा कॅनव्हास आहे. शेजारी विविधरंगांनी भरलेले पॅलेटही आहे. जेव्हा कधी त्या कॅनव्हासवर चित्र उतरेल, तेव्हा मी ते आवर्जून साऱ्यांना दाखवेन,' हे उद्गार आहेत, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांचे.

⁝ ⓘ

कुलगुरू डॉ. शिर्के हे येत्या ३० जून रोजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे प्राध्यापक म्हणून नियत वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. त्या निमित्ताने विद्यापीठात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय संख्याशास्त्र परिषदेमध्ये गुरुवारी (दि. १९) सायंकाळचे सत्र हे डॉ. शिर्के यांच्या सन्मानार्थ आयोजित केले होते. त्यामध्ये देशविदेशातील संख्याशास्त्रज्ञांनी डॉ. शिर्के यांच्यासमवेतच्या सहसंबंधांना उजाळा दिला. त्यांच्या शैक्षणिक, संशोधकीय व प्रशासकीय योगदानाचा गौरव केला. या गौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ आणि डॉ. शिर्के यांचे गुरू प्रा. आर.एन. रट्टीहळ्ळी होते. डॉ. सुनिता शिर्के आणि संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. रट्टीहळ्ळी यांच्या हस्ते डॉ. शिर्के यांचा कोल्हापुरी फेटा, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ. शिर्के यांना साडी व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास डॉ. शिर्के यांचे वडील तुकाराम शिर्के, बंधू अरविंद व मधुकर उपस्थित होते.

गौरवपर भाषणात अनेकांनी डॉ. शिर्के यांच्या हसतमुख व्यक्तीमत्त्वाचा उल्लेख केला. तो धागा पकडून डॉ. शिर्के उद्गारले, "आय वील कन्टिन्यू टू स्माईल!" या कार्यक्रमात बोलताना शिर्के यांनी, आपल्या जडणघडणीमध्ये योगदान देणाऱ्या शालेय जीवनापासून ते विद्यापीठीय जीवनापर्यंत सर्व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ते, म्हणाले, 'माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मला चांगले मार्गदर्शक शिक्षक मिळाले, म्हणून आजवरचा पल्ला गाठण्यात यश आले. जून १९८५मध्ये अर्थात बरोब्बर ४० वर्षांपूर्वी मी विद्यापीठात विद्यार्थी म्हणून दाखल झालो, तेथपासून हा कुलगुरू पदापर्यंतचा प्रवास याच कर्मभूमीत घडला. मान, सन्मान, पद, प्रतिष्ठा असे सर्व काही देणाऱ्या या मातृसंस्थेच्या ऋणातून उतराई होणे अशक्य आहे. मला घडविणाऱ्यांबरोबरच समस्या निर्माण करणाऱ्यांप्रतीही मी कृतज्ञ आहे. कारण समस्याच नसत्या, तर मी त्या सोडविल्या कशा असत्या? त्यामुळे या प्रवासात त्यांचे श्रेयही मोठे आहे.'

कुलगुरू पदापर्यंत झेप घेऊनही जमिनीशी घट्ट राहणारा प्रशासक....

अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट विद्यापीठाचे प्रा. प्रकाश पाटील, ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. शिवाजी डिसले, डी.जी. गोडसे, दिनेश हेलवाडे, रिझर्व्ह बँकेचे मधुसूदन अडकी, प्रा. बी.व्ही. धांद्रा, आयआयटी-तिरुपतीचे प्रा. एन. बाळकृष्ण, पंजाबच्या प्लाक्ष विद्यापीठाचे प्रा. टी.व्ही. रामनाथन, आयआयटी-मुंबईचे प्रा. सुब्रमण्यम, गुजरातचे प्रा. के. मुरलीधरन, आयआयएससी- बेंगलोरचे प्रा. शिरीष शेवडे, प्रा. व्ही.बी. घुटे, प्रा. एल.आर. शिंदे, प्रा. एस.रवी, टेक्सास विद्यापीठाचे प्रा. संजय शेटे, प्रा. आशिष सेनगुप्ता, प्रा. एच.व्ही. कुलकर्णी, प्रा. दत्तात्रय काशीद यांनी मनोगते व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाचे माजी संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एम.एस. प्रसाद यांनी शिर्के यांना व्हिडिओद्वारे शुभेच्छा दिल्या. प्रा. एस.आर. कुलकर्णी यांनी पत्राद्वारे आपल्या भावना कळविल्या. कोणत्याही समस्येवर तत्परतेने उपाय सुचविणारा, समस्या सोडविण्याला प्राधान्य देणारा उत्तम संख्याशास्त्रज्ञ, तंत्रज्ञानाभिमुख, विद्यार्थीप्रिय, विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यास प्राधान्य देणारा शिक्षक, कुलगुरू पदापर्यंत झेप घेऊनही जमिनीशी घट्ट राहणारा प्रशासक, आपत्ती व्यवस्थापन कुशल, प्रसन्नचित्त व हसतमुख व्यक्तीमत्त्वाचे धनी असलेला माणूस अशा अनेक विशेषणांसह स्तुतीसुमनांचा वर्षाव करीत कुलगुरू शिर्के यांच्या शैक्षणिक आणि संशोधकीय कारकीर्दीचा गौरव केला. डॉ. सुकुमार राजगुरू यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.

21 JUN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सर्च’समवेतचा सामंजस्य करार मैलाचा दगड ठरेल

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के ; डॉ. अभय बंग यांच्या संस्थेसोबत विद्यापीठाचा करार

कोल्हापूर : डॉ. अभय बंग यांच्या गडचिरोली येथील सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन ॲंड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेसमवेत झालेला सामंजस्य करार हा शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल, अशी भावना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली. ‘सर्च’चे संस्थापक अध्यक्ष डॉ. अभय बंग यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी विद्यापीठ आणि सर्च यांच्यादरम्यान सामाजिक संशोधनविषयक सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बंग हे महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या अनौपचारिक आणि व्यावहारिक अशा नई तालीम शिक्षणाचा कृतिशील कार्याचा वारसा पुढे नेत आहेत. हे करत असताना त्यांनी ‘सर्च’ची स्थापना केली. तेथे अनेक सामाजिक, आरोग्यविषयक प्रश्नांवर व्यापक आणि सूक्ष्म अध्ययन व संशोधन केले जाते.

डॉ. अभय बंग म्हणाले, कोल्हापूर ही शाहूनगरी आहे. या नगरीमधील शिवाजी विद्यापीठ आणि गडचिरोली येथील ‘सर्च’ यांचे एकत्र येणे आनंददायी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आता शैक्षणिक संस्थांना विविध सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची दिशा व दृष्टी दिली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांवर काम करणे शक्य होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने आता ‘सर्च’समवेत सहकार्याचे नवे पाऊल उचलल्याचा आनंद तर आहेच, त्याबरोबरच याद्वारे काही भरीव सामाजिक संशोधनाचे काम साकार होईल, असा विश्वास वाटतो.

यावेळी डॉ. बंग आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सागर डेळेकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नितीन माळी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.



कोल्हापूर : सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. अभय बंग. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

जनसंपर्क कक्ष
21 JUN 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ- 'सर्च' करणार सामाजिक संशोधन

## डॉ. अभय बंग यांच्या गडचिरोलीतील संस्थेशी सामंजस्य करार

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या गडचिरोली येथील सोसायटी फॉर एज्युकेशन, अॅक्शन अँड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेसमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला. याअंतर्गत विद्यापीठ सामाजिक संशोधनात योगदान देणार आहे.

'सर्च' चे संस्थापक-अध्यक्ष डॉ. बंग यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठ आणि सर्च यांच्यादरम्यान सामाजिक संशोधनविषयक सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'सर्च' मध्ये अनेक सामाजिक, आरोग्यविषयक प्रश्नांवर व्यापक आणि सूक्ष्म अध्ययन व संशोधन केले जाते.

शिवाजी विद्यापीठातील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सर्वप्रथम 'सर्च'ची कार्यप्रणाली समजावून घेण्यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर त्यांच्यासमवेत आपल्याला कोणत्या क्षेत्रांमध्ये उपयुक्त संशोधन करता येईल, याविषयी मंथन करावे. सामंजस्य करार हा विद्यापीठाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल. डॉ. बंग यांच्यासमवेत शिक्षक व संशोधकांनी ठराविक कालावधीनंतर आढावा बैठक घेऊन झालेले काम आणि पुढील कामाची दिशा या संदर्भातील नियोजन करावे.'

या वेळी डॉ. बंग आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. नितीन माळी, सुभाष कोंबडे, शिवाजी जाधव उपस्थित होते. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि सर्च यांच्यादरम्यान झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतर करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. अभय बंग. यावेळी शेजारी डॉ. सागर डेळेकर, महादेव देशमुख, श्रीकृष्ण महाजन, पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, सुभाष कोंबडे, नितीन माळी, शिवाजी जाधव उपस्थित होते.

### नागरिकांच्या समस्यांवर काम करता येणार

■ 'कोल्हापूर ही शाहूनगरी आहे. या नगरीमधील शिवाजी विद्यापीठ आणि गडचिरोली येथील सर्च यांचे एकत्र येणे आनंददायी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आता शैक्षणिक संस्थांना विविध सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची दिशा व दृष्टी दिली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांवर काम करणे शक्य होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने आता सर्चसमवेत सहकार्याचे नवे पाऊल उचलल्याचा आनंद तर आहेच, त्याबरोबरच याद्वारे काही भरीव सामाजिक संशोधनपर काम साकार होईल. त्यासाठी आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. बंग यांनी सांगितले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JUN 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# डॉ. अभय बंग यांच्या सर्च समवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार



कोल्हापूर, (महा न्यूज अॅण्ड व्ह्यूज ):

डॉ. अभय बंग यांच्या गडचिरोली येथील सोसायटी फॉर एज्युकेशन, अॅक्शन अंड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ (सर्च) या संस्थेसमवेत झालेला सामंजस्य करार हा शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल, अशी भावना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

सर्च'चे संस्थापक-अध्यक्ष डॉ. अभय बंग यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी विद्यापीठ आणि सर्च यांच्यादरम्यान काल (दि. १९) सामाजिक संशोधनविषयक सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी कुलगुरू बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बंग हे महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या अनौपचारिक आणि व्यावहारिक अशा नई तालीम शिक्षणाचे लाभार्थी वाहक आहेत. त्याच कृतिशील कार्याचा वारसा पुढे नेत असताना त्यांनी सर्च'ची स्थापना केली आहे. तेथे अनेक सामाजिक, आरोग्यविषयक प्रश्नांवर व्यापक आणि सूक्ष्म अध्ययन व संशोधन केले जाते. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सर्वप्रथम सर्च'ची कार्यप्रणाली समजावून घेण्यास प्राधान्य द्यावे. त्यानंतर त्यांच्यासमवेत आपल्याला कोणत्या क्षेत्रांमध्ये उपयुक्त संशोधन करता येईल, याविषयी मंथन करावे. सामाजिक दायित्वाच्या भावनेने प्रेरित विद्यार्थ्यांना या संशोधनामध्ये सामावून घ्यावे, जेणे करून हे सहकार्यसंबंध दूरगामी ठरू शकतील. डॉ. बंग यांच्यासमवेत शिक्षक व संशोधकांनी ठराविक कालावधीनंतर आढावा बैठक घेऊन झालेले काम आणि पुढील कामाची दिशा या संदर्भातील नियोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. बंग म्हणाले, कोल्हापूर ही शाहूनगरी आहे. या नगरीमधील शिवाजी विद्यापीठ आणि गडचिरोली येथील सर्च यांचे एकत्र येणे आनंददायी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने आता शैक्षणिक संस्थांना विविध सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची दिशा व दृष्टी दिली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांवर काम करणे शक्य होणार आहे. शिवाजी विद्यापीठाने आता सर्चसमवेत सहकार्याचे नवे पाऊल उचलल्याचा आनंद तर आहेच, त्याबरोबरच याद्वारे काही भरीव सामाजिक संशोधनपर काम साकार होईल, असा विश्वासही वाटतो. त्यासाठी आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. बंग आणि कुलसचिव डॉ. विलास शि[illegible] यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. प्र-कुलगुरू डॉ[illegible] पाटील यांनी प्रास्ताविक केले. नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख डॉ. नितीन माळी, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. शिवाजी जाध[illegible] उपस्थित होते.

21 JUN 2025 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र महत्त्वाचे - डॉ. अभय बंग

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** व्यापक सामाजिक कल्याणाच्या दृष्टीने संख्याशास्त्राचा वापर केला जाणे गरजेचे आहे. संशोधकांनी सुविधांनी सुसज्ज ठिकाणी जाण्याऐवजी जिथे समस्या आहेत, अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. तिथे समस्या सोडवणुकीच्या अनेक शक्यता सामोऱ्या येतात. लोकांचे जीवनमान बदलण्यासाठी संख्याशास्त्र हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंत डॉ. अभय बंग यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय

संख्याशास्त्र परिषदेस प्रारंभ झाला, यावेळी डॉ. बंग बोलत होते. अमेरिकेतील मिसीसिपी स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. प्रकाश पाटील यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उद्घाटन अध्यक्षस्थानी होते.

डॉ. अभय बंग यांचे 'लोकांसमवेत संशोधन' या विषयावर प्रबोधक बीजभाषण झाले. आदिवासी समाजाच्या संदर्भात केलेले विविध आरोग्यविषयक प्रयोग व प्रकल्पांमध्ये संख्याशास्त्र कसे उपयुक्त ठरत गेले, याविषयी त्यांनी सादरीकरण केले. ते म्हणाले, लोकांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, निरीक्षण केले पाहिजे, व्यापक माहिती मिळविण्यासह त्या माहितीचे विश्लेषण केल्याने उपयुक्त संशोधन साकार होते. आज संशोधकाला संशोधन निधी, लोकप्रियता या बाबी मोठ्या प्रमाणात मिळतात, पण या साऱ्या भवतालात लोकांचे काय, हा प्रश्न घेऊन उभा राहणारा खरा संशोधक असतो.

ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. अनिल गोरे, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. शिर्के, परिषद समन्वयक डॉ. शशीभूषण महाडिक यांनी मांडणी केली. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले.




स्मरणिकेचे प्रकाशन करताना डॉ. अभय बंग, डॉ. शशीभूषण महाडिक, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. सोमनाथ पवार.

पुढारी

# विद्यापीठात आज 'योग संगम' कार्यक्रम

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी (दि.२१) सकाळी ६.१५ वाजता 'योग संगम' कार्यक्रम शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात होणार आहे. यावेळी कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, प्रा.डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकमत

# 'तंत्रज्ञान' विभागाच्या १८० विद्यार्थ्यांना मिळाले लाखो रुपयांचे पॅकेज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधील १८० विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली. या विद्यार्थ्यांना वर्षाला ३ ते १० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज मिळणार आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मोठ्या वापरामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील रोजगारांचे प्रमाण वाढत असून त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान व नावीन्यपूर्ण अभियांत्रिकी शिक्षण अधिविभागात दिले जाते. विद्यापीठाचा केंद्रीय रोजगार कक्ष आणि तंत्रज्ञान अधिविभागाचा रोजगार कक्ष यांच्या मदतीने अनेक कंपन्यांमार्फत विभागात कॅम्पस ड्राइव्ह होत असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील रोजगार संधी मिळाव्यात, यासाठी विभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, डॉ. राजन पडवळ, डॉ. गणेश पाटील, शामल पवार कार्यरत आहेत.

पुढारी

# तंत्रज्ञान अधिविभागाची जलतरण, ॲथलेटिक्समध्ये उत्कृष्ट कामगिरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये लीड कॉलेज, विद्यापीठ व राज्यस्तरावरील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. जलतरण, ॲथलेटिक्स व सामूहिक क्रीडा प्रकारांमध्ये पदकांची कमाई केली. राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय वर्षातील ऋचा पाटीलने नागपूर येथे सुवर्णपदक, तर धैर्यशील भोसलेने विजयदुर्ग येथे खुल्या समुद्र जलतरणात ५ कि.मी. गटात रौप्यपदक पटकावले. ॲथलेटिक्स स्पर्धेत अधिविभागाने १५ पदके मिळवली. सामूहिक क्रीडा प्रकारांमध्ये खो-खो, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ महिला संघाने उपविजेतेपद पटकावले. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. ए. बी. कोळेकर, क्रीडा समन्वयक प्रवीण सावंत यांचे प्रोत्साहन मिळाले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर सुमारे ५०८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बीएस्सी, बी.टेक. आदी पाच अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला १,५८६ विद्यार्थी उपस्थित होते. दि. २० रोजी चार अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाल्याची माहिती परीक्षा विभागाने दिली.

तरुण भारत

# 'असे होते आपले शाहू महाराज' चरित्राचे २६ जूनला प्रकाशन

कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५० व्या जन्मवर्षाची आठवण म्हणून शिवाजी विद्यापीठाने शालेय विद्यार्थ्यांसाठी शाहू महाराजांचे चरित्र प्रकाशित करण्याचा संकल्प केला होता. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सूचनेनुसार डॉ. नंदकुमार मोरे लिखित 'असे होते आपले शाहू महाराज" या चरित्राचे प्रकाशन २६ जून रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते प्रकाशन सोहळा होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवणार आहेत.

पुढारी

## दैनंदिनी

● **कार्यक्रम** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या सहयोगाने योग संगम कार्यक्रम. **स्थळ** : राजमाता जिजाऊ साहेब सभागृह, शिवाजी विद्यापीठ. **वेळ** : सकाळी ६. १५ वाजता.

सकाळ

■ **आंतरराष्ट्रीय परिषद :** कुलगुरू डॉ. डी. के. शिर्के यांच्या सन्मानार्थ संख्याशास्त्रावरील आंतरराष्ट्रीय परिषद. स्थळ : शिवाजी विद्यापीठ, वेळ : सकाळी दहा

पुढारी

● **सेमिनार :** अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेसंदर्भात विद्यार्थी, पालकांसाठी मार्गदर्शन सेमिनार. **स्थळ :** तंत्रज्ञान अधिविभाग सभागृह, शिवाजी विद्यापीठ. **वेळ :** सकाळी १०.३० वाजता.

21 JUN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राचीन योगशास्त्र ते आधुनिक करिअरचा मार्ग


## कोल्हापूरकरांनी जपलाय योगाचा अखंड वारसा; उत्तम जीवनशैलीसाठीही उपयुक्त

कोल्हापूर : सागर यादव

प्राचीन भारतात उगम पावलेल्या आध्यात्मिक व शारीरिकशास्त्र असणाऱ्या योगाची परंपरा कोल्हापुरात अखंड जपण्यात आली आहे. इतकेच नव्हे, तर आधुनिक युगात हा योगा अनेकांच्या करिअरचे माध्यम म्हणून नावारूपाला आला आहे.

देशभरात योग प्रशिक्षण, अभ्यास करणाऱ्या विविध संस्था-संघटना सक्रिय आहेत. विवेकानंद योग संस्था, योग विद्याधाम, पतंजली योगपीठ, कैवल्य धाम लोणावळा, योग विद्याधाम नाशिक, कालिदास विद्यापीठ रामटेक, संत निरंकारी मिशन या व अशा संस्था-संघटनांच्या माध्यमातून योग प्रसाराचे काम सुरू आहे. याला कोल्हापूरसुद्धा अपवाद नाही.

कोल्हापुरात एक लक्ष सूर्यनमस्कार संकल्पाची अनोखी परंपरा भक्ती-सेवा विद्यापीठ हायस्कूलने जपली आहे. ७२ वर्षांपासून शाळेत हा उपक्रम अखंड सुरू आहे. एक लक्ष सूर्यनमस्काराचा उपक्रम दि. १ ऑगस्ट १९५३ पासून सुरू करण्यात आला. या संकल्पनेंतर्गत शाळेत प्रतिवर्षी दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट या पूर्ण महिनाभरात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी मिळून दररोज झेपतील तेवढे सूर्यनमस्कार घालण्याची परंपरा आजही सुरू आहे.



कोल्हापूर : भक्ती-सेवा विद्यापीठ हायस्कूलमध्ये १९५३ पासून योगाचा अविभाज्य घटक असणाऱ्या सूर्यनमस्काराची परंपरा अखंड जपण्यात आली आहे.



जागतिक योग दिन

"जीवघेण्या स्पर्धेच्या युगात ताणतणाव, मानसिक आजार, लठ्ठपणा, कॅन्सर, रक्तदाब यासारख्या व्याधींनी लोक त्रस्त आहेत. यावर उपाय-योजना म्हणून योग शास्त्राचा अभ्यास ३६५ दिवस अखंड सुरू ठेवणे अत्यावश्यक असल्याने तो जीवनाचा अविभाज्य घटक बनला पाहिजे.

- डॉ. संदीप पाटील, योग अभ्यासक

### विद्यापीठात दरवर्षी तयार होतात १०० योगशिक्षक

माणसाला शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक स्वास्थ्य देणारा योगा आज जीवनशैली आणि करिअरचा मार्ग बनला आहे. कोल्हापूरच्या योग अभ्यासाची परंपरा विकसित करण्याचे कार्य योग विद्या धाम, पतंजली योगपीठ व शिवाजी विद्यापीठसारख्या संस्था-संघटना करत आहेत. शिवाजी विद्यापीठात आजीवन अध्ययन विभागातर्फे योग प्रशिक्षण वर्गातून दरवर्षी १०० योगशिक्षक तयार होतात. २०२३ पासून एम.ए. योगशास्त्र विषय सुरू करण्यात आला आहे. तसेच विद्यापीठासह ठिकठिकाणी पतंजलीसारख्या योग संस्था दैनंदिन योग वर्ग घेतात. आयुष मंत्रालयाच्या वतीने योगसंदर्भातील ऑनलाईन व ऑफलाईन कोर्स सुरू आहेत.

सकाळ

# योगातून करिअरचे विविध पर्याय उपलब्ध



शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन विस्तार विभागात ६१ विषयांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. त्यातच योग प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतात. यात प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदविका, पदवी, उच्च योग शिक्षण अशी प्रशिक्षण सुविधा आहेत. सहा महिने, एक वर्षे, दोन वर्षांचे अभ्यासक्रम आहेत. तीन जिल्ह्यांत ४५० व्यक्ती योग प्रशिक्षण घेतात. ६०० विद्यार्थ्यांनी नुकतेच योग शिक्षणपूर्ण केले. अनेकजण योग प्रशिक्षक म्हणून करिअर करीत आहेत. योगामध्ये नेटची परीक्षा देता येते. योग विषयात सेटची परीक्षा देण्यासाठी तसेच पीएच.डी.चे शिक्षण उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

– **डॉ. रामचंद्र पवार**, संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ

- **सामान्य व्यक्तीपासून डॉक्टरही आमच्याकडे योग प्रशिक्षण घेतात**
- **आमच्या विद्यार्थिनी सध्या अमेरिकेत ऑनलाईन योग प्रशिक्षण देत आहेत**
- **वैयक्तिकस्तरावर योग प्रशिक्षक म्हणून करिअरची संधी**
- **भविष्यात शाळा, महाविद्यालयात योग प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी**

सकाळ

# शुल्क भरण्यासाठी विद्यापीठाचे स्वतंत्र 'पोर्टल'

विविध ४५० प्रकारांतील शुल्क भरण्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांना शिवाजी विद्यापीठात यावे लागत होते. त्यात वेळ, पैसा अधिक खर्च व्हायचा. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील जमा स्वीकृती विभागात दिवसभर गर्दी असायची. अनेकांचा शुल्क भरण्यासाठी दिवस खर्च व्हायचा. ते लक्षात घेऊन विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाने शुल्क भरण्यासाठी पूर्णपणे ऑनलाईन पेमेंट सुविधा सुरू केली. ऑनलाईन रिसीट पोर्टल २०२२-२३ मध्ये सुरू केले. विद्यापीठातील अतिथीगृह, विद्यार्थी सुविधा केंद्र आणि इतर काही विभागांमध्ये ऑनलाईन शुल्क भरण्याची सुविधा आहे. त्याने विद्यापीठाकडे शंभर टक्के शुल्क ऑनलाईन जमा होत आहे. त्यामुळे दीड वर्षांपूर्वी विद्यापीठ प्रशानाने जमा स्वीकृती विभागाची ऑफलाईन सुविधा पूर्णपणे बंद केली. आता विद्यापीठाकडून विविध स्वरूपातील देयके अदा करण्यासाठी ऑनलाईन सुविधा सुरू करण्याबाबतची प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू आहे.



"विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन रिसीट पोर्टलचा टॅब दिला आहे. त्याद्वारे क्यूआर कोड, युपीआय, डेबिट कार्ड, एफटीआरटीजीएस नेट बँकिंग यापैकी कोणत्याही पर्यायाच्या माध्यमातून शुल्क भरता येते. त्याची पावती लगेच उपलब्ध होते. भविष्यामध्ये गोपनीय कोड टाकणे, बँक-विद्यार्थी-विभागांची पावती पडताळणी सुलभ करण्यासह कोणी किती रक्कम भरायची, याची सुविधा नव्या प्रणालीमध्ये करण्यासह विद्यापीठ देय रकमेची प्रणाली विकसित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

**- डॉ. सुहासिनी पाटील**, वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ